आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२५ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन जाणाऱ्या यानाची अंतराळात झेप

- पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- पुढच्या शैक्षणिक वर्षीपासून सीबीएसईच्या १० वीच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा होणार

**आणि**

- संविधान हत्या दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

**<><><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन फाल्कन नाईन हे रॉकेट आज अंतराळात झेपावलं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ॲक्सिसऑम फोर या अवकाश मोहिमेला आज फ्लोरिडा इथे केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून १ मिनिटाने प्रारंभ झाला. या रॉकेटमध्ये असलेल्या स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळयानातून चार अंतराळवीरांचं पथक आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास करत आहे. शुभांशु शुक्ला यांनी अंतराळातून संदेश पाठवला आहे.

**होल्ड - शुभांशु शुक्ला**

**<><><><><>**

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातल्या वनाझ ते रामवाडी या कॉरिडोरचा हा विस्तार आहे. यात वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली दरम्यान मेट्रो मार्ग उभारले जाणार आहेत. येत्या ४ वर्षात हे मार्ग पूर्ण होण्याची शक्यता आहे. केंद्र आणि राज्य

सरकार या प्रकल्पाचा निम्मा-निम्मा खर्च करणार आहे. या प्रकल्पाविषयी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले….

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या निर्णयाबद्दल केंद्र सरकार आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. यामुळं पुण्याची वाहतूककोंडी सोडवायला मदत मिळेल तसंच शहराच्या विकासाला चालना मिळेल, असं अजित पवार म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या या बैठकीत ॲक्सिओम फोर या मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाचं स्वागत करण्यात आलं तसंच, मंत्रिमंडळाने अंतराळवीरांना शुभेच्छाही दिल्या. आणीबाणीच्या घोषणेच्या ५० वर्षपूर्तीनिमित्त या घटनेचा निषेध करणारा ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला. आणीबाणीला विरोध करणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्तींच्या बलिदानाचं स्मरण म्हणून त्यांना दोन मिनिटं मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

‘विकसित भारत, विकसित महाराष्ट्र’ या लक्ष्यासाठी महाराष्ट्र नेहमीच पुढं राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिली. ते मुंबईत MIDC च्या पुढाकारानं आयोजित "महाराष्ट्र उद्योग संवाद २०२५" परिषदेत बोलत होते. गेल्या १० वर्षांत महाराष्ट्राच्या विविध भौगोलिक भागांमध्ये औद्योगिक क्रांतीची नवी दिशा निर्माण झाली आहे, आजचा उद्योग संवाद हा केवळ विचारांचा नव्हे, तर कृतीचा संगम आहे, असं ते म्हणाले.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत या परिसंवादाचं उद्घाटन झालं. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचा आलेख उंचावत असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले. महाराष्ट्र हे औद्योगिक प्रेरणा देणारे बलशाली राज्य

असून, येथे गुंतवणुकीची अमर्याद शक्यता असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

पुढच्या शैक्षणिक वर्षीपासून सीबीएसईच्या १० वीच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा होतील. पहिली परीक्षा फेब्रुवारीत होईल. ही परीक्षा देणं विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल. या परीक्षेचा निकाल एप्रिलमध्ये जाहीर होईल. या निकालानंतर कुठल्याही ३ विषयातल्या गुणांमध्ये सुधारणा करायची असेल तर विद्यार्थ्यांना मे मध्ये होणारी परीक्षा द्यावी लागेल. तिचा निकाल जून महिन्यात जाहीर होईल. दोन्ही परीक्षांमधून या तिन्ही विषयांच्या गुणांपैकी ज्यावेळी सर्वाधिक गुण असतील, ते गृहीत धरले जातील असं सीबीएसईनं कळवलं आहे. बोर्डाची परीक्षा दोन वेळा होणार असली तरी अंतर्गत परीक्षा मात्र एकाचवेळी होईल.

**<><><><><>**

२५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीसाठी सगळ्यात काळा दिवस असून अशा त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणूनच तो दिवस कायम लक्षात राहण्याची गरज आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. संविधान हत्या दिवसानिमित्त मुंबईत राजभवन इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या काळात देशाची लोकशाही वाचवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या नागरिकांमुळेच आज भारत जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून उभा आहे, असं त्यांनी सांगितलं.

आणीबाणी लागू करणं ही लोकशाहीची हत्या होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना संपवणारा तो काळा दिवस होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

आणीबाणीच्या काळात देशाच्या लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात भारतीयांचा संघर्ष कायमच आपल्यासाठी प्रेरणादायी, ऊर्जादायी ठरेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

यावेळी मान्यवराच्या हस्ते आणीबाणीच्या विरोधात लढा देणाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री मंगलप्रभात लोढा, आशीष शेलार, अशोक उइके आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

आणीबाणीच्या काळात नवीन नेतृत्वाची बीजं रोवली गेली आणि त्यातून नरेंद्र मोदी नावाचा नेता घडला याची कथा सांगणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते नवी दिल्ली इथे झालं. 'द इमर्जन्सी डायरीज-इयर्स दॅट फोर्ज्ड अ लीडर' असं या पुस्तकाचं नाव आहे. आणीबाणीच्या काळातले आपले अनुभव या पुस्तकात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नमूद केले आहेत. आणीबाणी ही भारतीय लोकशाहीतला सर्वात काळा अध्याय असून या काळात नागरिकांचे मूलभूत अधिकार पायदळी तुडवले गेल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमात म्हणाले. या कार्यक्रमात शहा यांनी लोकतंत्र जिंदाबाद यात्रेलाही हिरवा झेंडा दाखवला. देशभरात या यात्रेच्या माध्यमातून संवैधानिक मूल्यं, लोकशाही राज्यव्यवस्थेतले हक्क आणि आणीबाणीच्या काळातून मिळालेले धडे याविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आज विविध जिल्ह्यांमध्ये 'संविधान हत्या दिवस' पाळण्यात आला.

**रत्नागिरी, जळगाव,नाशिक, बीड, धुळे, पालघर**,**धाराशिव, नांदेड, नंदुरबार सिंधुदुर्ग सह विविध जिल्ह्यांमध्ये** आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे गौरवपत्र, गुलाबपुष्प देवून गौरव करण्यात आला. राज्य शासनाने आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या व्यक्तींच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसंच विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हा

माहिती कार्यालयाच्या माध्यमातून विशेष माहितीपूर्ण चित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गेल्या वर्षी झालेल्या राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात गंभीर विसंगती असल्याचा आरोप करणारी याचिका आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. गेल्या वर्षी २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीच्या मतदानात संध्याकाळी सहा वाजल्यानंतर मतदानाचा टक्का वाढल्याचा दावा चेतन अहिरे यांनी वकील प्रकाश आंबेडकर यांच्यामार्फत केला. निवडणूक आयोगाचे वकील आशुतोष कुंभकोणी यांनी, या याचिकेत विजयी उमेदवार हे पक्षकार नसल्याने या निकालांना आव्हान देण्याचा अधिकार याचिकाकर्त्याकडे नसल्याचा युक्तिवाद केला. केंद्र सरकारचे वकील उदय वारुंजीकर यांनी निकाल जाहीर झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत ही याचिका दाखल करणं आवश्यक असल्याकडे न्यायालयाचं लक्ष वेधलं. हे दोन्ही युक्तिवाद मान्य करून न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या पीठाने ही याचिका फेटाळून लावली.

**<><><><><>**

राज्यातली सर्व शासकीय कार्यालयं भाड्याच्या जागांवर न राहता स्वमालकीच्या इमारतींमध्ये स्थलांतरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले. राज्यात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देताना नागरिकांना त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी असं त्यांनी अधिकाऱ्यांना बजावलं.

**//<><><><><>//**